# राज्यभर सायबर सुरक्षा शिक्षण बळकट करण्यासाठी

## 'व्हॉट नाऊ' आणि महाराष्ट्र सायबर यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई।** सायबर गुन्हे, सायबर छळ, सेक्सटॉर्शन तसेच सर्व प्रकारच्या ऑनलाइन गैरवर्तनाविरोधात कार्य करणारी अग्रगण्य स्वयंसेवी संस्था व राष्ट्रीय जनजागृती चळवळ 'व्हॉट नाऊ' हिने महाराष्ट्र सायबरसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार (MoU) केला आहे. या कराराच्या माध्यमातून राज्यभर प्रतिबंधात्मक शिक्षण, डिजिटल सुरक्षितता साक्षरता आणि जनजागृती उपक्रम अधिक सक्षम करण्याचा उद्देश आहे. या सामंजस्य कराराच्या स्वाक्षरी समारंभाला श्री. यशस्वी यादव, आयपीएस, अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र सायबर,



महाराष्ट्र शासन, यांची उपस्थिती होती. तसेच 'व्हॉट नाऊ'च्या संस्थापक आणि प्रसिद्ध उद्योजिका सौ. नीती गोयल; सह-संस्थापक तसेच एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी अँड लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक श्री. अक्षत खेतान; आणि सह-संस्थापक व पिल्लई इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. निवेदिता श्रेयांस हेही उपस्थित होते.

या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित करताना श्री. अक्षत खेतान म्हणाले, "आज सायबर धोके केवळ तांत्रिक स्वरूपाचे राहिले नसून ते सामाजिक आणि कायदेशीर आव्हान बनले आहेत. ही भागीदारी प्रतिबंध, जनजागृती आणि नागरिकांना डिजिटल विश्वात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक साधने देण्यावर केंद्रित आहे." संयुक्त जनजागृती मोहिमा, क्षमता वृद्धी कार्यक्रम आणि व्यापक समुदाय संपर्क उपक्रमांच्या माध्यमातून महाराष्ट्रात अधिक सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने हे सहकार्य एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.